
GOOD
AFTERNOON

स्वभाव म्हणजे रंगांची पेटी,
कधी कुठला रंग सांडेल,कधी कुठला रंग मिसळेल याचा
अंदाज बांधता येत नाही,फक्त स्व:तचे रंग रंगवताना
इतरांची चित्रं नाहक बिघडणार नाहीत याची जमेल तितकी
काळजी घेतली की आपले रंग देखील छान खुलतात....

YourQuote.in


THE GREATEST INDIAN EPIC
यदा यदा हि धर्मस्य
ग्लानिर्भवती भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य
तदाऽऽत्मनं सृजाम्यहम ॥
WEG
WEG
SANJAY KHAN'S
MAHABHARAT
DVD
VIDEO
ENGLISH SUBTITLES
14 DVD SET

# मृत्युंजय

# दिग्विजयी, दानविक्रमी, अशरण सूर्यपुत्राची ही कहाणी. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते पुस्तक



लढता लढता हरलो जरी,
हरल्याची मला खंत
नाही..

लढा माझा माझ्यासाठी,
लढाईला माझ्या अंत
नाही..

- inmarathi.in

पुन्हा उठेन आणी पुन्हा
लढेन शांत..




# शिवाजी सावंत


## शिवाजी सावंत यांच्या लेखणीतून साकार झालेले 'मृत्युंजय

शिवाजी सावंत यांचा जन्म ३१ ऑगस्ट १९४० रोजी एका सामान्य शेतकरी कुटुंबात, कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा गावात झाला. ते मराठी कादंबरीकार होते. त्यांनी लिहिलेली मृत्युंजय ही पौराणिक कादंबरी मराठी कादंब-यांत मानदंड मानली जाते. शिवाजी सावंत त्यासाठीच मृत्युंजयकार सावंत म्हणून ओळखले जातात. पुण्यात स्थायिक झाल्यावर १९७४ ते १९८० अशी सहा वर्षे त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाच्या 'लोकशिक्षण' या मासिकाचे सहसंपादक, व नंतर संपादक म्हणून काम केले. १९८३ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि पुढील आयुष्यात फक्त लेखनावरच पूर्ण लक्ष केंद्रित केले. शिवाजी सावंत हे इ.स. १९९५ पासून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे काही वर्षे उपाध्यक्ष होते. १९८३ मध्ये बडोदा येथे भरलेल्या "बडोदे मराठी साहित्य संमेलनाचे" ते संमेलनाध्यक्ष होते. कऱ्हाड येथे भरणा-या ७६व्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदाचे ते उमेदवार होते. १८ सप्टेंबर २००२ आपल्या उमेदवारीच्या प्रचारासाठी गोव्यात गेले असताना मडगाव येथे, शिवाजी सावंत यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला.

# कादंबरीचे मुखपृष्ठ


मृत्युंजय
-शिवाजी सावंत

# कादंबरीचे मलपृष्ठ





शिवाजी सावंत यांच्या 'मृत्युंजय' ला
भारतीय ज्ञानपीठाचा



मूर्तिदेवी पुरस्कार १९९५



लेखक – शिवाजी सावंत

पृष्ठसंख्या – ७४४


प्रकाशन – मेहता पब्लिशिंग हाउस

मुल्यांकन – ४.४ | ५

जगातील सर्वात मोठं महाकाव्य म्हणजे महाभारत. महाभारतातील व्यक्तिरेखा मोजता मोजता भोवळ येते म्हणतात ते काही खोटे नाही. महाभारत म्हणजे प्रेम, लोभ, राजकारण, सत्ता, हिंसा, व्याभिचार, करुणा, दुःख, हट्ट असे जितके सारे वेगवेगळे मानवभाव असतील त्यांची सुरेख सांगड घातली आहे. या साऱ्या व्यक्तिरेखांच्या गोतावळ्यात उठून दिसते ती व्यक्ती म्हणजे कुंतिपुत्र, अंगराज, राधेय, सुर्यपुत्र कर्ण. कर्णाची कहाणी ऐकताना मला नेहमी तळ्यातील त्या बदकांत हा राजहंस आयुष्यभर कसा राहू शकला हीच बाब बोचत राहते. वाटेवर चालताना लागलेली ठेच जितकं दुःख देते त्याहून अधिक दुःख तो दगड आपल्या आप्तस्वकीयांकडून ठेवला होता याचे होते ही जाणीव कर्णाचे जीवन सतत करून देते.

शिवाजी सावंत यांच्या मृत्यूंजय कादंबरीने कर्ण या नावाला एक वेगळीच ओळख मिळवून दिली आहे. तलम वस्त्रला लावलेल्या ठिगळाची उपमा जेंव्हा कर्णास लेखक देतो तेंव्हा काळीज ओलावते. शिवाजी सावंत यांचा हातखंडा असलेल्या प्रसंग वर्णनाची अनुभूती तुम्हाला एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जाईल. कोणीतरी म्हटले आहे. “If you are a reader you can live thousands of life” आणि त्याच प्रमाणे आपणही हळू हळू कर्ण होऊन जगत आहोत असच वाटायला लागतं. रोज सकाळी उठून कोवळ्या उन्हात पाठ खरपूस होईपर्यंत बसावे वाटते, ही लेखकाची किमयाच म्हणावी लागेल. आपणास माहीत नसलेल्या अनेक नातेसंबंधांना ही कादंबरी नक्कीच उलगडा देईल असे मला वाटते.

# स्वगत








कुंतीला मिळालेले असामान्य वरदान , त्यातूनच कर्णाचा झालेला असामान्य जन्म ,जगाच्या भीतीने कुंतीने घेतलेला कठोर निर्णय , गुरु द्रोण आणि पांडवांकडून कर्णाचा झालेला अपमान, त्यातूनच दुर्योधानासोबत जन्मास आलेले मित्रप्रेम , द्रौपदी वस्त्रहरण , कुरुक्षेत्रातील युद्ध या सर्वच गोष्टी वरवर प्रत्येकास माहित आहेतच . पण या प्रत्येक गोष्टींत काही बारीक बारीक अशा कितीतरी गोष्टी दडलेल्या आहेत ज्या पुस्तक हाती घेण्याआधी आपल्या विचारांतही नसतात किंवा वर्षानुवर्षे आपण या प्रश्नांची उत्तरे शोधत आलो आहोत पण जी अजूनही अनुत्तरीत आहेत

कुंतीला ही पुत्रप्राप्ती नक्की कशी झाली ?सारथ्याच्या घरी कर्णाचे बालपण कसे असेल? शोण म्हणून असलेला राधेचा मुलगा या कर्णासोबत कसा वागत होता? कर्णाची पत्नी वृषाली नक्की कशी  इंद्राला कवच कुंडल दान केल्यानंतर निस्तेज झालेल्या कर्णाप्रमाणे त्याचे प्रेम जीवनही  कोमेजलेले  होते? सूर्याचा पूत्र असूनही त्याने धर्माच्या विरोधात अधर्मी दुर्योधनास नेहमी साथ का दिली... केवळ मैत्रीसाठी? द्रौपदी वस्त्रहरणात  त्याने द्रौपदीचे रक्षण नक्की का केले नाही ? अभिमन्यूला धर्माविरुद्ध जात मारणाऱ्यात  कर्ण का सामील झाला ? खरेच तो अधर्मी होता ? जर असे होते तर मग श्रीकृष्ण विरुद्ध पक्षात असतानाही त्याने या सूतपूत्राचा अंतिम संस्कार  करण्यात रस का दाखवला? जसजसे आपण एकेक  पान वाचत जावू तसतसा  हा हळूहळू उलगडत  जाणारा खुलासा आपल्याला जागीच खिळवून ठेवतो.

## श्रीकृष्णाने कर्णाची केलेली प्रशंसा

https://www.youtube.com/watch?v=pTnTaJAk-o4

# समानतेचे तत्व

: https://www.youtube.com/watch?v=QHjQZ8KCj_E

" अरे या कुरुक्षेत्रावर कोणी आहे का मला मदत करणारा. युद्धात मुलगा मारला गेला माझा. त्याच्या अंतिम कार्यासाठीही द्रव्य नाही माझ्याकडे. कोणी आहे का ? "

" पुत्रा , आयुष्यभर जे मजपाशी होते ते ते सर्व जेव्हा जेव्हा ज्याने मागितले मी त्यास दिले. पण आज हा याचक असाच रिकाम्या हाताने माझ्यापाशी येऊन परत जाणार हे कदापि शक्य नाही. तू एक काम कर . तो पडलेला जमिनीवरचा दगड घे आणि माझ्या तोंडात असलेले हे २ सोन्याचे दात पाड आणि या दुःखी पित्यास दे . त्याच्या मुलाचा अंतिम संस्कार करण्यासाठी ते त्याच्या कामा येतील. "

मृत्यंजयसाठी –

महाराष्ट्र राज्य पुरस्कार (१९६७)

न. चिं. केळकर पुरस्कार (१९७२)

ललित मासिकाचा पुरस्कार (१९७३)

भारतीय ज्ञानपीठाचा ‘मूर्तिदेवी पुरस्कार’ (१९९४)

फ़ाय फाउंडेशन पुरस्कार (१९९६)

आचार्य अत्रे विनोद विद्यापीठ पुरस्कार (१९९८)

पूनमचंद भुतोडिया बंगाली पुरस्कार (ताम्रपटासह, कलकत्ता -१९८६)

’मृत्युंजय’च्या प्रतिमा दवे यांनी केलेल्या गुजराती भाषांतराला, गुजरात सरकारचा साहित्य अकादमी पुरस्कार (१९९०)

त्याच गुजराती भाषांतराला केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार (१९९३)

# काहीही झाल तरी
# प्रयत्न सोडू नका


"आपले आभार मानण्यासाठी शब्दच कमी पडतात
म्हणून फक्त एकच शब्द धन्यवाद !"
MajhiMarathi.com